Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# वैदर्भिय स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या – यशोदाबाई जोशी, मनुताई बापट, जाईबाई चौधरी

डॉ. अभिलाशा राऊत
सहा. प्राध्यापिका , हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर .

**सारांश**
विदर्भात इंग्रजी शासन कर्ते, ख्रिस्ती धर्मप्रसारक व समाज सुधारक यांच्याद्वारे चालविण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे 19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकांमध्ये स्त्री वर्गात मोठ्या प्रमाणात जागृती घडून आली. सुशिक्षित पुरूषवर्गाकडून प्रोत्साहन मिळाल्यामुळे स्त्रियांनी सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनात भाग घेण्यास सुरवात केली. विदर्भातील सुशिक्षित स्त्रियांनी त्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग इतर स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी केला. या सुशिक्षित स्त्रियांमध्ये लेडी यशोदाबाई जोशी, मनुताई बापट, कमलाताई हॉस्पेट, शांताबाई रानीवाला, जाईबाई चौधरी यांची नावे प्रामुख्याने विदर्भातील स्त्री शिक्षणाच्या इतिहासात घेतली जातात. विदर्भात सुशिक्षित स्त्रियांची जी पिढी निर्माण झाली, त्या नवीन पिढीत विदर्भातील स्त्रियांबरोबरच भारताच्या इतर प्रांतातून आलेल्या व विदर्भात स्थायिक झालेल्या स्त्रियांचाही समावेश आहे. काही स्त्रिया या कोणाची पत्नी किंवा सून किंवा बहिण या नात्याने विदर्भात आल्या व येथेच कायमच्या स्थायिक झाल्या. अशा विविध स्त्रियांनी विदर्भातील स्त्री शिक्षणाच्या कार्यात महत्वाचे योगदान दिले आहे.

**प्रस्तावना :**
पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भात आधुनिक शिक्षणाचा श्रीगणेशा उशिरा झाला. इस 1854 नंतर विदर्भात आधुनिक शिक्षण व स्त्री शिक्षण यांचा विचार करण्यास समाजाने सुरवात केली



होती. तत्कालिक सामाजिक परिस्थितीनुसार स्त्रियांचे जीवन चार भिंतीत बंदिस्त झाले होते. 'सार्वत्रिक शिक्षण' या संकल्पनेचा विदर्भात अभाव होता. पुरूष मंडळींचेच शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांच्याद्वारेही स्त्री शिक्षणासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत. त्यातच नागपूरकर भोसलेंची राजवट विदर्भात असतांना भोसले राजांद्वारेही स्त्री शिक्षण किंवा एकुणच समाजातील लोकांच्या शैक्षणिक विकासाबाबत उदासीनतेचे धोरण ठेवण्यात आले होते. त्यामुळे स्त्री–पुरूष साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते.
विदर्भात इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर मात्र परिस्थिती झपाट्याने बदलली. इंग्रजांनी भारताच्या इतर प्रातांप्रमाणेच विदर्भात आधुनिक शिक्षण पद्धतीचा प्रसार–प्रचार केला. स्त्री शिक्षणाचे कार्य करणाऱ्या लोकांना त्यांनी सहकार्य व प्रोत्साहन दिले. कालांतराने पश्चिम महाराष्ट्रातील मुंबई–पुणे या भागात आधुनिक इंग्रजी शिक्षण घेतलेली बरीच आधुनिक व सुधारक वृत्तीची मंडळी नोकरी वा व्यवसायानिमित्त विदर्भात येवू लागली व ही मंडळी कालांतराने विदर्भातच स्थायिक झाली. या शिक्षित मंडळींचा विदर्भातील स्त्रियांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनावर दूरगामी परिणाम झाला.

**लेडी यशोदाबाई जोशी (इस 1868–इस 1948)–विदर्भातील स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या :–**
विदर्भातील स्त्री उन्नतीचा विचार व आचार प्रसुत करणाऱ्या अमरावतीच्या लेडी यशोदाबाई जोशी या विदर्भातील स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या होत्या. त्यांचे पती सर मोरोपंत जोशी हे अमरावतीतील प्रसिद्ध वकील, सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते व राजकारणातील गाजलेले एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. यशोदाबाईंनी त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची प्रेरणा सर मोरोपंत जोशी यांच्याकडून घेतली होती. किंबहुना यशोदाबाईंचे व्यक्तिमत्व घडविण्यात सर मोरोपंत जोशी यांचा सिंहाचा वाटा होता. परंतु असे असले तरी यशोदाबाईंच्या अंगी असलेल्या चिकाटी, नवीन गोष्टी आत्मसात करण्याची जिद्द, कौटुंबिक व सामाजिक विरोध सहन करण्याची सहनशीलता इत्यादी गुणांमुळे यशोदाबाईंचे व्यक्तिमत्व विदर्भातील स्त्री विकासाच्या इतिहासातील एक स्वतंत्र दालन म्हणून महत्वाचे आहे.
यशोदाबाई या सातारा येथील श्री गोविंद रामकृष्ण अभ्यंकर यांची कन्या होत्या. तत्कालीन सामाजिक रीतिरिवाजांनुसार वयाच्या 8 व्या वर्षी यशोदाबाईंचा विवाह अमरावतीतील मोरोपंत जोशी यांच्याशी झाला.[1] विवाहानंतर घरात प्रतिकूल वातावरण असतांनाही मोरोपंतांच्या प्रोत्साहनामुळे यशोदाबाईंनी घरीच शिक्षण घेण्यास सुरवात केली. फ्रेंच होली क्रॉस कॉन्व्हेंटमधील सूझन नावाची शिक्षिका त्यांना इंग्रजी लिहिणे, वाचणे याबरोबरच इतरही गोष्टी शिकविण्यासाठी घरी येऊ लागली होती.[2] गृहिणी म्हणून येणारी सर्व कामे तत्परतेने करूनही लोकसेवेची कामे स्त्रीला करता येतील हा विचार यशादोबाई च्या मनात दृढ करण्यात यशोदाबाईंना मोरोपंतांबरोबरच शिक्षिका सूझन हिचीसुद्धा मदत झाली.[3]
घरातील वडील मंडळींची मने सांभाळून यशोदाबाई इंग्रजी शिकल्या. त्याचबरोबर मोरोपंतांच्या इच्छेनुसार त्या घोडेस्वारी करणे, सायकल चालविणे, टेनिस खेळणे, कला–कुसरींची कामे करणे, जोडा घालणे, शाल घेणे, छत्री वापरणे, फिरावयास जाणे, अशा अनेक तत्कालिन समजाने स्त्रियांसाठी वर्ज्य ठरविलेल्या गोष्टी यशोदाबाईंनी करण्याचे धाडस दाखविले. त्यांचा समाजोन्मुख दृष्टिकोन तयार होण्यास तत्कालीन समाजसुधारक न्या. रानडे व रमाबाई रानडे यांचे कार्य

त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरले. त्याचे कारण म्हणजे इस 1888 पासून जोशी कुटुंबाचा न्या. रानडे, डॉ. भांडारकर, डॉ. भाटवडेकर, विष्णु मोरेश्वर भिडे इत्यादि पुण्याकडील सुधारक मंडळींचा जवळचा संबंध प्रस्थापित होऊ लागला होता. त्यामुळे पुण्यामुंबईच्या अनेक लहानमोठ्याा सार्वजनिक संस्थांचे कार्य त्यांना अवलोकन करण्यास मिळाले. या संस्थाप्रमाणेच विदर्भातही काम सुरू करण्यास मोरोपंत जोशी उत्सुक होते. त्यांनी या कार्यात यशोदाबाईंनाही प्रोत्साहन दिले. त्यातूनच इस 1892 मध्ये यशोदाबाईंनी अमरावतीला 'वनिता समाज' या संस्थेची स्थापना केली आणि त्या माध्यमातून स्त्री सुधारणा व जागृतीचे महत्वाचे कार्य केले.

### *वनिता समाज व यषोदाबाईंचे स्त्री षिक्षणविषयक कार्य :–*

जातपात, धर्म इत्यादी भेद न करता स्त्रिया व मुलींची उन्नती करणे, सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग वाढविणे, त्यांना संसारोपयोगी गोष्टी (शिवणकाम, विणकाम, भरतकाम इत्यादी) शिकविणे या उद्देशाने मुंबईतील आर्य महिला समाजाच्या धर्तीवर अमरावतीत 'वनिता समाजाची' स्थापना करण्यात आली होती. या संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांना सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहित करण्याचे महत्वाचे कार्य यशोदाबाईंनी केले. त्याबरोबरच सुरवातीस कीर्तनांच्या माध्यमातून स्त्रियांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्याविषयी जाणीव निर्माण करण्याचे कार्य यशोदाबाईंनी केले.

इस 1897 मध्ये अमरावती येथे राष्ट्रीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. या प्रसंगी वनिता समाजातील स्त्रियांच्या कलाकुसरीचे व स्वदेशी वस्तूंचे एक लहानसे प्रदर्शन पुरूष वर्गाच्या विरोधाला न जुमानता यशोदाबाईंच्या प्रयत्नाने भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे कौतुक झाले. यानंतर कॉंग्रेस अधिवेशनांसोबत स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविण्याची प्रथा सुरू झाली. अर्थात ही प्रथा सुरू करण्याचे श्रेय यशोदाबाई व त्यांच्या वनिता समाजाला जाते. इतकेच नव्हे तर कॉंग्रेसच्या या अधिवेशनात मोठ्या संख्येने स्त्री वर्ग उपस्थित राहिला. याचेही श्रेय यशोदाबाईंना जाते.

साक्षरता ही ज्ञानाची गुरूकिल्ली आहे, हे लक्षात ठेवून वनिता समाजाने प्रथमपासूनच स्त्रियांना साक्षर करण्याचा प्रयत्न चालविला होता. अमरावतीत मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय होती; परंतु माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी मुलींना मुंबई–पुण्याला पाठवावे लागे. ही गोष्ट सर्वांना परवडणारी नव्हती. त्यामुळे वनिता समाजाचे एक शिष्टमंडळ तत्कालीन वऱ्हाडच्या कमिश्नरांना भेटले व त्यांनी अमरावतीत मुलींसाठी हायस्कूल सुरू करण्याची मागणी केली. वनिता समाज व यशोदाबाई यांच्या प्रयत्नामुळेच इस 1916–17 मध्ये अमरावतीला मुलींचे हायस्कूल व वसतीगृह सुरू झाले.

थोडक्यात, यशोदाबाईंनी वनिता समाजाच्या माध्यमातून अमरावतीतील स्त्रियांना अक्षर ओळख करून देण्याबरोबरच शिवणकाम, विणकाम यासारखे अर्थार्जनास सहायक असे विषय स्त्रियांसाठी सुरू करून चार भिंतीत बंदिस्त असलेल्या स्त्रियांना सार्वजनिक जीवनात आणण्याचे महत्वाचे कार्य केले. कॉंग्रेसच्या अधिवेशनांना स्वतः हजर राहून इतर स्त्रियांनाही प्रोत्साहन दिले. अशाप्रकारे, सामाजिक व राजकीय जीवनात सहभागी होणाऱ्या व स्त्री उन्नती तसेच स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या विदर्भातील लेडी यशोदाबाई जोशी या प्रथम स्त्रीसुधारक होत्या.

### *मनुताई बापट (इस 1882–इस 1938) यांचे स्त्री षिक्षणविषयक कार्य :–*

ज्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे, निराधार स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांना कामधंदा शिकवून सन्मानाने जगण्यास समर्थ करणे या गोष्टी दुर्मिळ होत्या, त्या काळात या हेतूंनी व स्त्रियांविषयीच्या कळकळीने प्रेरित होवून मनुताई बापट या बालविधवेने लेडीज् होम क्लास् या संस्थेचे रोपटे अकोला येथे लावले.

मनुताईंचे वडील अनंतराव भागवत हे डिस्ट्रिक्ट प्लीडर या पदावर अकोल्याजवळ तेल्हारा या गावी कार्यरत होते. मनुताईंचे बहुतेक आयुष्य आपल्या काकांकडे दत्तोपंत भागवतांकडे अकोल्यालाच गेले. तत्कालीन सामाजिक रूढीनुसार, वयाच्या 13 व्या वर्षी मनुताईंचा विवाह शंकर गोविंदराव बापट यांच्याशी झाला. परंतु दुदैवाने लग्नानंतर अवघ्या चार वर्षांनी त्या विधवा झाल्या.

मनुताई या पश्चिम महाराष्ट्रातील प्रसिद्ध सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या मामेबहीण होत्या.[4] आगरकरांच्या स्त्री सुधारक कार्यांचा व विचारांचा प्रभाव भागवत कुटुंबावर रूजला होता. मनुताईंचे काका दत्तोपंत यांना अकोल्यात मोठी प्रतिष्ठा होती. तत्कालिन अकोल्याच्या सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे मोठे नाव होते. त्या विधवा झाल्या तरी त्यांना पुण्यातील हुजुरपागेतील शाळेत शिकण्याची संधी मिळाली. परंतु त्या शालांत परीक्षेला बसण्यापूर्वीच खूप आजारी पडल्या व त्यांना अकोल्याला परतावे लागले. त्यांची अशक्त झालेली प्रकृती लक्षात आल्याने त्यांच्या घरच्या वडील मंडळींनी त्यांना पुण्यात पुन्हा न पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मनुताई शालांत परीक्षा उत्तीर्ण होवू शकल्या नाही.[5]

शिकलेली मुलगी घरी बसली तर तिला काही विरंगुळयाचे आणि उपयुक्त काम द्यावे, म्हणून दत्तोपंतांनी आपल्या या बालविधवा पुतणीवर घरच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सोपविली. भागवत, आगरकर व महाजनी यांच्या कुटुंबातील मुलांना घेवून मनुताईंचा अभ्यासवर्ग सुरू झाला. मनुताईच्या आवडीचे हे काम होते; परंतु तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही.

### *लेडीज् होम क्लास् ची स्थापना व स्त्री षिक्षणविषयक कार्याची सुरवात :–*

मनुताईंची चुलतबहीण वेणुताई हिने शिक्षण पूर्ण करून पुण्यातील महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या शिक्षणसंस्थेत काम करण्यास सुरवात केली होती. वेणुताई या सुद्धा बालविधवा होत्या. मनुताई जेव्हा पुण्याला वेणुताईकडे गेल्या तेव्हा त्यांनी महर्षी कर्वेंच्या संस्थेचे काम जवळून पाहिले होते. तसेच हुजुरपागेत शिकत असतांना त्यांना सेवासदन सारख्या काही संस्थांची माहिती मिळाली होती. अशाच स्वरूपाचे काही काम अकोल्यातील स्त्रियांसाठी करावे, असा विचार त्यांच्या मनात घोळू लागला होता.

अकोल्यात तेव्हा टिळक राष्ट्रीय कन्या शाळा होती आणि जैन विधवाश्रमही होते. त्यांच्या जोडीला मनुताईंनी प्रौढ स्त्रियांसाठी मोफत शिक्षणवर्ग सुरू केला. 10 ऑक्टोंबर, 1911 रोजी सौ. लक्ष्मीबाई सरंजामे यांच्या अध्यक्षतेखाली मनुताईंच्या लेडीज् होम क्लास् या संस्थेची ताजनापेठ, अकोला येथील मुलींच्या शाळेतील एका लहानशा खोलीत सुरवात झाली. पुढे काही महिन्यांनी भाड्याच्या तीन खोल्या घेवून त्यात हे वर्ग नेण्यात आले. अकोल्याचे सिव्हिल सर्जन कर्नल फावलर यांनी टाऊन डिसपेंसरीची जुनी इमारत संस्थेसाठी मोफत दिली. पुढील काळात पुढे संधि येताच या इमारतीस जोडूनच संस्थेने आपल्या मालकीची एक नवीन इमारत बांधली.[6]

सुरवातीस फक्त प्रौढ स्त्रियांसाठी सुरू झालेल्या या वर्गाने केवळ अकोल्यातील नव्हे तर एकुण विदर्भातील मुलींची शिक्षणाची गैरसोय लक्षात घेऊन अँग्लो व्हर्नाकूलर स्कूल ची स्थापना केली. या शाळेला समाजाचा भरभरून प्रतिसाद मिळाला. समाजातील प्रत्येक स्तरातील स्त्रिया व मुली मोठ्याा संख्येने या वर्गांना दाखल होवू लागल्या.

### *मनुताईंचे स्त्री शिक्षणविषयक कार्य :–*

लेडीज् होम क्लास् ची स्थापना 1911 मध्ये झाली. तेव्हापासून ते 1936 पर्यंत म्हणजे संस्थेचा रौप्य महोत्सव साजरा होईपर्यंत मनुताईंनी संस्थेची संपूर्ण जबाबदारी आपल्या सहकारी स्त्रियांसोबत स्वीकारली होती. इस 1936 मध्ये त्या स्वेच्छेने निवृत्त झाल्या आणि संस्थेची जबाबदारी त्यांनी

गोपाळ गणेश आगरकर यांच्या पत्नी यशोदाबाई आगरकर यांचे भाऊ श्री आप्पासाहेब फडके यांच्याकडे सोपविली.

1911 ला संस्थेच्या स्थापनेपासून ते 1936 मध्ये निवृत्त होईपर्यंत संस्थेचे एका इवल्याशा रोपट्यातून वटवृक्ष होईपर्यंत आयुष्याची तब्बल 25 वर्षे मनुताईंनी संस्थेसाठी कामी लावली. प्रौढ स्त्रियांना व्यावहारिक शिक्षण देणे, त्यांची कार्यक्षमता वाढविणे व त्यांना उत्तम नागरीक बनविण्याचा प्रयत्न करणे या उद्देशाने लेडीज् होम क्लास् सुरू करण्यात आले होते. स्त्रियांची सोय लक्षात घेवून दुपारी 2.30 ते 3.30 पर्यंत हे वर्ग ठेवण्यात आले होते. स्त्रियांना त्यांच्या इच्छेनुसार, बौद्धिक व औद्योगिक असे शिक्षण दिले जात होते. बौद्धिक वर्गात स्त्रियांना मूळाक्षरांपासून ते मराठी चौथ्या वर्गापर्यंत शिकविले जात असे व प्रौढ स्त्रियांना फक्त वाचावयास व शुद्ध लिहावयास शिकविले जात असे. औद्योगिक शिक्षणामध्ये शिवणकाम, विणकाम, चित्रकला, पेटीवादन, कागदाची विविध फुले व हार करणे शिकविले जात असे. 'सत्यभामा वाचनालय' प्रौढ स्त्रिया व मुलींसाठी सुरू करण्यात आले होते. लेडी डफरिन इस्पितळाच्या सहकार्याने प्रथमोपचार, आरोग्यविषयक प्रश्न आणि शुश्रूषा यांच्या संबंधीची व्याख्याने संस्थेत मनुताई स्त्रिया व मुलींसाठी आयोजित करीत.[7]

मनुताई यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य अंगिकारल्यामुळे त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनीही त्यांना सहकार्य दिले. लेडीज् होम क्लास् ही संस्था देणग्यांवर चालत होती. मुलींना मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती. मनुताईंच्या काकांचे–दत्तोपंतांचे–चिरंजीव माधवराव व सून राधाबाई दोघेही देणग्यांसाठी विदर्भ पालथा घालून देणग्या गोळा करीत. संस्थेच्या इमारतीच्या सामानापासून अनेक गोष्टी माधवराव पुरवित. मनुताईंचे सख्खे भाऊ श्रीधरपंत संस्थेच्या हिशेबतपासणीचे काम सांभाळत. यशोदाबाई आगरकरांनी संस्थेला एक टाईपरायटर मशीन घेवून दिले होते.

महर्षी कर्वेपासून मनुताईंना त्यांच्या कार्याची मूळ प्रेरणा मिळाली होती. त्याच बरोबर मनुताईं लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी यांच्या कार्यामुळे ही प्रेरीत झाल्या होत्या. महिला शिक्षण परिषदा किंवा स्त्री शिक्षणाशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये मनुताई स्वतः भाग घेत. मनुताईंची संस्था राष्ट्रीय आंदोलनाच्या काळातच बहरली. त्यामुळे संस्थेत राष्ट्रभक्तीपर गीते गायिली जात. मनुताई स्वदेशीच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यामुळेच त्यांनी सुतकताई शिकविण्याचे वर्ग ही संस्थेत चालविले होते आणि तिथले सूत खादी भांडाराकडे विकले जात असे. संस्थेवर आणि विद्यार्थिनींवर त्या जीवापाड प्रेम करीत. फक्त मुलींसाठी मोफत शिक्षण देण्यापुरते त्यांचे कार्य मर्यादित नव्हते तर गरीब मुलींचे फाटके कपडे त्या स्वतः शिवून देत असत. गरज पडल्यास त्यांना जेवण देत. राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात शहरात पिकेटिंग चालू असतांना मुलींना घरोघरी स्वतः पोहचून देत. संस्थेची झाडलोट, खिडक्या तावदाने पुसणे अशी कामेही गरज पडल्यास त्या करीत असत.

मनुताईंनी आपल्या श्रमाने व जिद्दीने संस्थेचा विकास घडवून आणला. अनेक अडचणींवर मात करीत त्यांनी प्रौढ स्त्रिया व मुलींसाठी विविध उपक्रम राबविले. त्याचबरोबर स्वदेशीचा कार्यक्रम अंमलात आणतांना सूतकताईच्या माध्यमातून स्वदेशी व राष्ट्रीयत्वाची भावना यांची जाणीव विद्यार्थिनींमध्ये निर्माण केली. मनुताईंच्या रूपाने विदर्भातल्या स्त्री शिक्षणाच्या प्रयत्नांना मोठी गती मिळाली. आगरकर, चिपळूणकर, महाजनी, कर्वे, मोरोपंत जोशी, लोकमान्य टिळक, दत्तोपंत भागवत यांच्यासारखी सुधारक मंडळी मनुताई व त्यांच्या संस्थेशी विविध प्रकारे जोडली गेली होती. मनुताईंचे आयुष्य सर्जनशील विधायकतेने उजळून गेले आणि व्यक्तिगत सुख–दुःखांना दूर ठेवून एखादी ध्येयवादाने प्रेरित झालेली स्त्री सार्वजनिक क्षेत्रात कसे प्रभावी कार्य करू शकते, याचे दर्शनही मनुताईंच्या माध्यमातून वैदर्भीय समाजाला घडले.

इस 1938 मध्ये मनुताईंच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शाळेला 'मनुताई बापट कन्या शाळा' हे नाव देण्यात आले. आज ही शाळा मनुताईंच्या आयुष्याचे चिरस्थायी स्मारक बनून अकोल्यातील मुलींच्या शिक्षणाचे कार्य करीत आहे.

### *सौ. जाईबाई चौधरी (इस 1892–इस 1964) दलित स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रणेत्या :–*

विदर्भात जाईबाई चौधरी या दलित स्त्री शिक्षणविषयक कार्यात आद्य प्रणेत्या ठरल्या. जाईबाईंचा जन्म नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात 2 मे 1892 रोजी झाला. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती हलाखीची असल्यामुळे जाईबाई इच्छा असूनही शिकू शकल्या नाही. वयाच्या 11 व्या वर्षीच त्यांचा विवाह नागपूरच्या बापू चौधरी यांच्याशी झाला. जाईबाईंना शिक्षणाची अत्यंत आवड असल्यामुळे नागपूरातील पाचपावली भागातील किसन फागुजी बनसोडे यांनी मुलींसाठी सुरू केलेल्या 'संत चोखामेळा मुलींची शाळा' या प्राथमिक शाळेत प्रवेश घेवून जिद्दीने शिक्षण घेण्यास जाईबाईने सुरवात केली. कुटुंबाची हलाखीची आर्थिक स्थिती, तत्कालिन चातुर्वर्ण्य बंधनात अडकलेल्या समाजाचा दलित स्त्री शिक्षणाला होणारा विरोध अशा एकुण परिस्थितीत जाईबाई शिक्षण घेत होत्या. शिक्षण व अभ्यासाच्या साहित्यचा अभाव असल्यामुळे त्या विटांच्या तुकड्यांनी भिंतीवर अक्षरे गिरवून पाठांतर करीत, रस्त्याच्याकडेवर असलेल्या दिव्याखाली बसून अभ्यास करीत.[8] त्यांची ही जिद्द व श्रम मिस ग्रेगरी नावाच्या ख्रिस्ती स्त्री धर्मोपदेशिकेच्या लक्षात आले आणि त्यांनी जाईबाईंना शिक्षणासाठी पूर्ण सहकार्य दिले. मिस ग्रेगरीच्या मदतीनेच जाईबाई आपले शिक्षण पूर्ण करू शकल्या.

जाईबाईंना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नागपूरातील टिमकी भागातील मिशन शाळेत चार रूपये महिना पगारची शिक्षिकेची नोकरी मिळाली. परंतु शिक्षिका 'महार' म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांची नावे शाळेतून काढून घेतली. त्यामुळे शाळा संचालकांनीच जाईबाईला नोकरीतून काढून टाकले. या घटनेने जाईबाई अत्यंत दुःखी झाल्या. आपल्याला शिक्षण घेतांना व नंतरही ज्या अडचणींना समोरे जावे लागले होते त्याप्रकारच्या अडचणी दलित स्त्रियांपुढे येवू नये व जशी मिस ग्रेगरीने आपली शिक्षणाची इच्छा पूर्ण केली तसेच आपण ही स्त्रियांसाठी सहाय्यक बनावे, गरीब, अस्पृश्य, असहाय्य मुलींसाठी काहीतरी करावे हा विचार जाईबाईंच्या मनात निर्माण झाला. त्यातूनच महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन इस 1922 मध्ये नागपूरातील मंगळवारी भागात संत चोखामेळा मुलींची प्राथमिक शाळा जाईबाईंनी सुरू केली.

ही शाळा जाईबाईंच्या घरीच भरत असे. प्रारंभी शाळेत ठराविक तासिकांचे वेळापत्रक व शिक्षक नव्हते. त्या स्वतः मुलींना शिकवण्याचे कार्य करीत असत. जाईबाई घरोघरी, गावोगावी फिरून लोकांनी मुलींना शाळेत पाठवावे यासाठी प्रयत्न करीत. जाईबाईंना गोड गळ्याची देणगी निसर्गाने दिली होती. त्या स्वतः गीत रचून त्यांना चालीवर गाऊन त्या माध्यमातून स्त्रियांना व मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देत. जाईबाईंना त्यांच्या कार्यात बराच त्रास सहन करावा लागला. त्या दलित स्त्री असल्यामुळे सवर्ण हिंदू वर्गाकडून त्यांना होणारा विरोध सहन करावा लागला. शाळा चालविण्यासाठी आर्थिक अडचण सोसावी लागली. त्यांनी स्त्रियांसाठी रात्रीची शाळा चालविली होती. या शाळांना चालविण्यासाठी जाईबाईंना देणग्या मिळवाव्या लागत. त्यासाठी त्या गावोगाव फिरून लोकांमध्ये दलित स्त्रियांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी प्रयत्न करणे व शाळांसाठी देणग्या मिळविणे, ही दोन्ही कामे करीत.

जाईबाईंनी स्त्री शिक्षणाचे कार्य करीत असतांनाच दलितांच्या सामाजिक, राजकीय आंदोलनांमध्ये व परिषदांमध्ये सहभागी होवून दलित स्त्री मुक्तीचा विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य ही केले. इस 1930 ची दलित महिला परिषद, नागपूर, इस 1938 ची अस्पृश्य महिला परिषद, नागपूर, इस 1939 ची अस्पृश्य परिषद, सावनेर, या परिषदांमध्ये भाग घेवून जाईबाईंनी दलित स्त्रियांची बाजू मांडली व त्यांच्यात त्यांच्या हक्कांची जाणीव निर्माण केली. डॉ. आंबेडकरांद्वारे स्थापन करण्यात आलेल्या 'डिप्रेस्ड क्लास् असोशिएशन' च्या त्या सभासद होत्या. त्याबरोबर त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या 'डिप्रेस्ड विमेन् क्लास्' च्या सरचिटणीस पदाची जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडली होती.[9]

ज्या समाजाने स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे बंद केली होत, स्त्रियांनी शिक्षण घेणे हे पाप समजले जात होते. अशा समाजात एका दलित स्त्री ने जाईबाईने समाजाचा रोष पत्करून महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या स्त्री सुधारणा विषयक कार्यापासून प्रेरणा घेवून दलित स्त्री शिक्षणाचे अत्यंत

महत्वाचे असे कार्य केले. रानावनात काड्या–गोवऱ्या वेचून, ओझे वाहून, गरीबी व दुःखाचे चटके सहन करून, ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या शिक्षणाचे संस्कार घेऊन शिक्षिका झालेल्या जाईबाई या दलित स्त्रियांसाठी प्रेरणास्थान ठरल्या होत्या जाईबाईंच्या संत चोखामेळा कन्या शाळेच्या सुवर्ण महोत्सवाप्रसंगी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी 'स्त्री जीवन फुलविणारी व दलित स्त्रियांना शैक्षणिक व सांस्कृतिक संजीवनी देणारी थोर सेविका' या शब्दात जाईबाईंच्या कार्याचा गौरव केला होता.

जाईबाईंनी स्त्री शिक्षणाचे लावलेले रोप त्यांच्या कुटुंबीयांनी वाढविले. जाईबाईचा मुलगा श्रवण चौधरी याने माध्यमिक वर्ग सुरू केले व त्यांच्या पत्नी अनसूयाबाई चौधरी यांनी उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग मुलींसाठी सुरू केले. आज ही शाळा जाईबाई चौधरी ज्ञानपीठ या नावाने मुलींच्या शैक्षणिक विकासात महत्वाचे योगदान देत आहे.

### *निष्कर्ष :–*

विदर्भातील स्त्री सुधारकांमध्ये ब्राह्मण, मराठी, मारवाडी, दलित तसेच बालविधवा अशा सर्वच प्रकारच्या स्त्रियांचा समावेश होतो. या स्त्रियांनी कुटुंब व समाज यांचा विरोध पत्करून शिक्षण घेतले. इतर स्त्रियांना साक्षर करण्याच्या उद्देशाने शाळा काढल्या. त्यासाठी या स्त्री सुधारकांना कौटुंबिक व सामाजिक विरोधाबरोबरच आर्थिक चणचणही सोसावी लागली. तरीही या सुधारक स्त्रियांनी आपले कार्य चालूच ठेवले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक स्त्रियां साक्षर झाल्या. स्त्रियांना केवळ अक्षर ओळख करून देण्यापुरते या स्त्री सुधारकांचे कार्य मर्यादित राहिले नाही तर स्त्रियांना शिवणकाम, विणकाम, दाई प्रशिक्षण अशा स्वरूपाचे प्रशिक्षण देवून आर्थिकदृष्ट्या त्यांना सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला. पुढील काळात विदर्भातील स्त्रियांचा राजकारण व समाजकारण यात सहभाग वाढला. याचे महत्वाचे कारण म्हणजे स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार–प्रचार झाल्याने राजकारण व समाजकारण या दोन्ही बाबींची जाण त्यांच्यात निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य येथील स्त्री सुधारकांनी स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून केले होते.

### *संदर्भग्रथ सूची*

1.हिंगवे, मो. धो; 'सर मोरोपंत जोशी यांचे संक्षिप्त चरित्र आणि आठवणी,' प्रथमावृत्ती, 1940, मो. धो. हिंगवे, नागपूर; पृष्ठ 09
2.डॉ. पाठक, दमयंती; 'भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात वैदर्भिय महिलांचे योगदान;' प्रथमावृत्ती, 2003, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठ 30–31
3.जोशी, यशोदाबाई, ' आमचा जीवनप्रवास'; 1965, व्हिनस प्रकाशन, पुणे, पृष्ठ 46
4.ढेरे, अरूणा; विस्मृतिचित्रे; द्वितियावृत्ती, 2001; श्री विद्या प्रकाशन, पृष्ठ 225
5.कित्ता, पृष्ठ 227
6.'रौप्य महोत्सव स्मरणिका,' लेडीज् होम क्लास्, 1937, अकोला, पृष्ठ 01 व 02
7.ढेरे, 'विस्मृतिचित्रे', पृष्ठ 235–237
8.डॉ. चौधरी, शिल्पा (संपादिका); 'प्रवास सजीव क्षणांचा : सुधाकर चौधरी गौरव ग्रंथ'; 2011, जाईबाई चौधरी ज्ञानपीठ, नागपूर, पृष्ठ 12
9.कित्ता, पृष्ठ 10

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org